अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शैक्षणिक
वर्ष २०१३-१४ पासून मान्यता दिलेल्या
अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था
सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. सीटीसी-२०१३/(प्र.क्र. १७३)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १५ मे, २०१३.

वाचा : १. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांचे रिट याचिका क्र. ३०२३/२०१२ या प्रकरणी दिनांक १६.०७.२०१२ चे आदेश.
२. सदस्य सचिव, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे पत्र क्र. western/१-७२८१६६६११/२०१२/LOA/Corrigendum-१, दिनांक ०९.०४.२०१३
३. कार्यकारी संचालक, मानव कल्याण चॅरीटेबल ट्रस्ट जि.अकोला यांचे दिनांक १६.०४.२०१३ चे पत्र.
४. सदस्य सचिव, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे पत्र क्र. western/१-१४१३२५२१७३/२०१३/EOA, दिनांक १०.०४.२०१३.

<u>प्रस्तावना</u> : रिट याचिका क्र. ८८४७/२००७ या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर प्राप्त झालेले कायदेविषयक अभिप्राय, इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०१२ पर्यंत मान्यता दिलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रवेशप्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात आले व त्यानुसारच शासनाचे आदेश देखील निर्गमित करण्यात आले आहेत. दिनांक ३० जून, २०१२ नंतर अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त झालेल्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रवेशप्रक्रिया न राबविता त्यांनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रवेश प्रक्रिया राबविणे शासनास अभिप्रेत आहे. परंतु मानव कल्याण चॅरीटेबल ट्रस्टचे, मानव स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँण्ड टेक्नोलॉजी, व्याळा, बाळापूर, जि.अकोला या महाविद्यालयाला अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०१२ नंतर मान्यता दिल्याने संस्थेने मा. उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र. ३०२३/२०१२ दाखल केली होती. त्यावर दिनांक १६.०७.२०१२ रोजी मा. उच्च न्यायालयाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेच्या अधिन राहून सदर संस्थेस अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास व महाविद्यालयाचे नाव केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्याचे आदेश दिलेले होते. सदर संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दि.०९.०४.२०१३ च्या शुद्धीपत्रान्वये अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून मान्यता दिलेली आहे. तथापि, परिषदेने उशिराने मान्यता दिली असल्याने सदर संस्थेचे नाव केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात आले नव्हते. तथापि, सदर संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करिता मुदतवाढ (EOA) दिलेली आहे. त्यामुळे सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : मानव कल्याण चॅरीटेबल ट्रस्टचे, मानव स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँण्ड टेक्नोलॉजी, व्याळा, बाळापूर, जि.अकोला या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्ययांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य विद्यापीठ अधिनियम,१९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षणयांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी अॅक्ट,१९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

९) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना

वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, क्लासरुम इ.) करणे आवश्यक आहे.

११) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणेआवश्यक राहील.

१२) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(म .मा .मोरवे)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (सर्व), (संचालकामार्फत)
सर्व विद्यापीठांचे कुलसचिव,(संचालकामार्फत)
सर्व संबंधित संस्था (संचालकामार्फत)
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली- ११० ००१.
सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती/तांशि-४